VOLUME - VI, ISSUE - II - MARCH-AUGUST - 2018
**IDEAL - ISSN 2319 - 359X - IMPACT FACTOR - 4.988 (www.sjifactor.com)**

# अणुक्रमणिका मराठी भाग - १


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बचतगट: महिला सबलीकरणाचे प्रभावी माध्यम<br>**डॉ. रेणुका द. भडवणे (भावसार)** | १-३ |
| २ | मोलकरीन स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचार पार्श्वभूमीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास<br>**डॉ. प्रमिला भुजाडे** | ४-१० |
| ३ | लिंग आणि मराठी साहित्य<br>**डॉ. कैलास इंगळे** | ११-१६ |
| ४ | सामाजिकरण आणि लिंग भुमिका<br>**छाया सवडतकर** | १७-२१ |
| ५ | महिला बचतगट आणि महिला सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. व्यंकटेश ज. खरात** | २२-२४ |
| ६ | संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री विषयक संवेदना<br>**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे** | २५-२९ |
| ७ | स्त्री-विषयक म्हणीतून घडणारे समाजदर्शन<br>**शिंदे सखाराम बाबूराव** | ३०-३६ |
| ८ | महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्री-विषयक विचार आणि सामाजिक सुधारणेची दृष्टी : एक परिप्रेक्ष<br>**अर्चना वैजनाथ धोडके** | ३७-४३ |
| ९ | बी.एड्. महाविद्यालयात शिकणाऱ्या विवाहित व अविवाहित महिलांचे मानसिक आरोग्य : एक अभ्यास<br>**स्वाती तात्याराव कांबळे** | ४४-४८ |
| १० | भारतात महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप<br>**डॉ. दिनकर एस. कांबळे**<br>**विश्वास दामोधर तळेकर** | ४९-५१ |
| ११ | 'स्त्री माझ्या आत' मधील भावविश्व<br>**डॉ. म. ई. तंगावार** | ५२-५७ |
| १२ | ताण-तणाव आणि योगा<br>**कविता दादाराव वाघमारे**<br>**डॉ. एस. एस. पाठक** | ५८-६३ |

VOLUME - VII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.2 (www.sjifactor.com)

# ६. संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री विषयक संवेदना

**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे**
प्रमुख, मराठी विभाग, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर.

हजारो वर्षापासून सनातन धर्मव्यवस्थेने विटाळाच्या नावाखाली भक्ती आणि मुक्ती पासून उपेक्षित ठेवलेल्या स्त्रियांना भक्तीच्या प्रवाहात आणून मुक्ती पर्यंत पोहचवण्याचे ऐतिहासिक कार्य संतांनी केले. लिंगाच्या अधारे केला जाणारा भेदभाव नाकारून स्त्रियांना भक्ती आणि मुक्तीचा अधिकार बहाल केला. यातूनच महाराष्ट्रात स्त्री संतांची एक परपंरा प्रवाहीत झाली. महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, वेणाबाई, बहिणाबाई सारख्या संत कवयित्रीनी भक्तीच्या प्रवाहात सामील होऊन आत्मविश्वासाने मुक्ती पर्यंत वाटचाल केली. आपल्या अभंगातून जीवन चिंतनाचा कळस गाठलेल्या संत तुकारामांच्या अभंगातून विविध संदर्भाने स्त्री बद्दलचे जे चिंतन साकारले आहे ते अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे. स्त्रीकडे पाहण्याचा एक उच्च, उदात्त आणि पवित्र असा दृष्टिकोन संत तुकारामांच्या अभंगातून साकारला आहे. संपूर्ण जगच विष्णुमय असल्याचे सांगून वर्ण, जात आणि लिंगाच्या अधारे माणसात केला जाणारा भेदभाव त्यांनी स्पष्टपणे नाकारला.' या रे या रे लहान थोर | भलते याती नरी नर || ' या उदघाषणेतूनच लिंगभावाच्या पलीकडे जावून स्त्रीला सन्मान आणि समान संधी देण्याची त्यांची भूमिका व्यक्त होते.

जगातील एक दोन धर्माचा अपवाद सोडला तर बहुतांश धर्मपंथानी स्त्रियांना कनिष्ठ लेखून प्रयत्नपूर्वक लांब ठेवले. सर्व प्रकारच्या विटाळाचे मूळ , पापाची उत्तरपेठ, मुक्तीचे वज्रकपाट, नरकाची राजवट, परमार्थ मार्गातील धोंड म्हणजे स्त्री ही धारणा हजारो वर्षापासून समाजात रूजली. यामुळे ज्या नराला नारायण होवून जन्ममृत्याच्या फेऱ्यातून मुक्ती मिळवायचे आहे त्याने सर्वप्रथम स्त्रीचा त्याग केला पाहिजे असे जनमनात पिढयान पिढया पासून रूजले होते. 'स्त्री भनिजे मत्त द्रव्याचा रावो गा : इतर द्रव्य प्राशणे माज़विती : स्त्री दर्शन मात्रे माजविती :' यामुळे साधकांनी चित्रातली स्त्री देखील पाहू नये असे जे स्वामी चक्रधर सांगतात. यातून स्त्रीकडे पाहण्याची तत्त्कालीन मानसिकता सूचित होते. या मानसिकतेतूनच परमार्थाच्या मार्गात स्त्री त्याज्य ठरली. ज्या स्त्रीने जन्म दिला, वाढवले, प्रेम दिले तिचा सहवास साधकांना वर्ज्य मानण्यात आला. ही परंपरा कितीही जुनी असली, सर्व धर्मपंथांनी याचे कितीही समर्थन केले तरी ती विवेकांला पटणारी नव्हती. स्त्रीच्या माणूस पणाचा अवमान करणारी ही धारण संत तुकारामांनी ठामपणे नाकारली. 'नव्हे ब्रह्मचर्य बाईलेच्या त्यागें | वैराग्य वाउगे देशत्यागे ||' स्त्रीचा त्याग करणे म्हणजे ब्रह्मचर्य नसून आपल्या वासना विकारांचा त्याग करणे म्हणजे बंह्मचर्य अशी विवेकाधिष्ठीत ब्रह्मचर्य संकल्पनेची जी पुनर्मांडणी संत तुकाराम करतात. त्यातून स्त्रीकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोनच बदलतो. स्त्री आणि देशाचा त्याग करून ब्रह्मचर्य साधत नसून त्यासाठी अंतःकरणाची निर्लेपवृत्ती आवश्यक असल्याचे तुकाराम सांगतात. सन्यास आणि ब्रह्मचर्याचे केवळ

बाहयावडंबर माजवून मनात स्त्रीबद्दल अभिलाशा बाळगणाऱ्या वासनांध दांभिक साधू सन्याशावर तुकारामांनी अत्यंत परखड शब्दात प्रहार केलेला आहे.

ज्या विटाळातून विश्वातील प्रत्येक मानवाचा जन्म झाला त्या नैसर्गिक विटाळामुळे स्त्रीला अपवित्र माणून तुच्छ लेखणे हे विवेकाला तर्काला पटण्यासारखे नव्हते. यामुळे स्त्रीच्या नैसर्गिक देहधर्मापेक्षा परस्त्री आणि परधनाबद्दलच्या अभिलाशेला विटाळ मानले. स्त्रीच्या नैसर्गिक विटाळातूनच नव्या जिवाचा जन्म म्हणजे सृजन घडते पण मनातील विकारातून भिषण संहाराकडे वाटचाल होते. म्हणून तुकारामांनी परस्त्री आणि परधनाच्या अभिलाशेला विटाळ ठरवले. परस्त्री आणि परधनाची अभिलाशा हे जगातील सर्व संघर्षाचे मुळ आहे. जगाच्या तीनहजार वर्षाच्या इतिहासात जे दीड हजार लहान मोठे युद्ध झाल्याचे सांगितले जाते त्या सर्व युद्धाची बिजं परस्त्री आणि परधनाच्या अभिलाशेतच सापडतात. वासनांध माणसाच्या मनातील हीनकस विचार आणि विकार समाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने हाणीकारक असल्यामुळे तुकारामांनी त्याचा प्रकर्षाने धिक्कार केला आहे.'विटाळ तो परद्रव्य परनारी | येथुनि जो दुरी तो सोवळा || ' विटाळ आणि सोवळयाची संकल्पनाच तुकारामांनी पूर्णतः बदलली. परद्रव्य आणि परनारीची अभिलाशा म्हणजे विटाळ असून ज्याच्या मनात हा विटाळ नाही अशा निर्मळ मनाच्या मानसाला सोवळे संबोधले. परद्रव्य आणि परनारीची अभिलाशा ज्या माणसाच्या मनात निर्माण होते त्याची वाटचाल विनाशाकडे होते. त्यातून त्याच्या सभोवतालचा समाजही भरडून निघतो. 'परद्रव्य परनारीचा अभिलाष | तेथूनि हारास सर्वभाग्या||' याचा प्रत्यय रामायण आणि महाभारता सारख्या महाकाव्यातून येतो. रावणासारखा बलाढय राजा परस्त्रीच्या मोहात पडून देशोधडीला लागला. कौरवांचे विशाल राज्य धुळीला मिळाले ते परस्त्री आणि परधनाच्या हव्यासातूनच म्हणून तुकाराम म्हणतात.' स्त्रिया धन बा हें खोटे | नागवले मोठे मोठे || म्हणोनि सांडा दोनी | सुख पावाल निदानीं | सर्व दुःखासी कारण | हींच दोन्हीचीं प्रमाण ||' माणसाचे सर्व दुःख व अशांतीचे मुळ म्हणजे परस्त्री आणि परधनाबद्दल मनात निर्माण मोह आहे. परस्त्री परधनाबद्दलची असक्ती हे विषाप्रमाणे विनाशकारी असल्याचे तुकाराम सांगतात.'परद्रव्य परनारी | झाली विषाचिये परी ||' परनारीचा नाद विनाशकारी असूनही जो पुन्हा त्याच मार्गाकडे धावतो त्याचा तुकारामांनी धिक्कार केला आहे . ' परद्रव्य परनारी | अभिळासूनि नाकं धरी || जळो तयाचा आचार | व्यर्थ भार वाहे खर ||' चारित्र्यहीन नीतिभ्रंष्ट माणूस क्षणिक सुखाचा आनंद घेत असला तरी तो समाजाचा आदर्श होवू शकत नाही. त्याच्या कृतीतून सामाजाचे कोणतेही कल्याण साधत नाही. परद्रव्य आणि परनारी पाहून ज्याच्या चित्तात कुठलाही विकार उत्पन्न होत नाही अशा शुद्ध अंतःकरणाच्या सयमी व्यक्तीचा तुकारामांनी पदोपदी गौरवच केला आहे. 'परद्रव्य परकांता | नातळे जयाचिया चित्ता ||' असा नीतिमान माणूस सोवळा आणि पवित्र असून त्याचा आदर्श समाजात रूजला पाहिजे ही तुकारामांची तळमळ आहे.

सतं तुकाराम निसर्गदत्त काम वासनेला नाकारत नाहीत तर वासनांध विकृत मनोवृत्तीला नाकारतात. "संयमानं विषयाचं भोग घेणं, हे विषय त्याग करण्याप्रमाणच आहे"०१ अशी तुकारामांची भूमिका असल्याचे डॉ. आ.ह.साळुखे सांगतात.

आपली पत्नी आणि धनाचा यथोचितउपभोग घेण्याला तुकामांचा आक्षेप नाही. तर आपल्या पत्नीची उपेक्षा करून परस्त्रीच्या मागे धावण्याला त्यांचा सक्तविरोध आहे. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' या अभंगात प्रापंचिक जीवनाचा आदर्श मांडताना तुकाराम परस्त्रीमध्ये आई आणि बहिण पाहण्याचा संदेश न चुकता देतात. 'परउपकारी नेणे परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया ||' जो व्यक्ती परस्त्रीचा सन्मान करतो त्याच्या बद्दल तुकारामांच्या मनात नितांत आदर आहे. स्त्रीच्या सन्मानातच समाजाचा उत्कर्ष आहे. या गोष्टीवर तुकारामांची दृढ निष्ठा आहे. परस्त्रीला आई मानल्याने तिच्या मातृत्वाचा गौरव होतो आणि त्यातून आपले कोणतेही नुकसान नसते. 'पराविया नारी माउली समान | मानिलिया धन काय वेंचे ||' म्हणून ही वृत्ती अंगी बाणवण्याचा आग्रह तुकाराम धरतात. परस्त्रीकडे मातृत्त्वभावातून पाहण्याची एक उदात्त दृष्टी तुकाराम देतात. त्यांच्या या भूमिकेचा गौरव करतांना डॉ.तानाजी पाटील लिहितात. ''स्त्रीकडे पाहण्याचा केवढा उंचीवरचा हा दृष्टिकोन आहे. इतरांना लाजवून सोडणारा हा विचार आहे. परस्त्रीला आईच्या ठिकाणी पाहणारे तुकाराम विचार आणि वर्तन या दोन्ही दृष्टीने कितीतरी उंचीवर जातात. माणसातील विकारवशतेची भावना गळून गेल्यानंतर जी उदारता, कारुण्याची भावना त्याच्या अंतःकरणात भरून राहते. तीच तुकारामांच्या ठिकाणी जाणवते.''०२ मनात पाप किंवा संदेह ठेवून बेगडीपणे परस्त्रीला माता संबोधने तुकारामांना पसंत नाही. स्त्री बद्दलचा आदरभाव आतून असला पाहिजे त्यात निसर्गदत्त प्रांजळपणा आणि पावित्र्य असले पाहिजे अशी तुकारामांची स्पष्ट भूमिका आहे. 'परस्त्रीते म्हणता माता | चित्त लाजविते चित्ता ||' परस्त्रीला माता म्हणताना ज्याला मनातून लाज वाटते त्याने खोटा देखावा करू नयेअसे ते सांगतात.

परस्त्रीला मुखाने माता म्हणणे सोपे असते पण तो मातृभाव हृदयात जोपासून तसे वर्तन करणे विलक्षण कठिण असते. याबाबत तुकारामांची परीक्षा पाहण्यासाठी किंवा त्यांना बदनाम करण्यासाठी मंबाजी, भट्टएका मोहक स्त्रीला तुकारामाकडे पाठवतो. तेव्हा तिच्या सौंदर्याने माहीत न होता तुकाराम त्या स्त्रीमध्ये रुक्माई पाहून आपले विवेकयुक्त वैराग्य आणि संतत्त्व सिद्ध करतात. अपघातानेआपल्या जीवनात येणाऱ्या परस्त्रीकडे कोणत्या दृष्टीतून पहावे याचा एक दिव्य आदर्श तुकारामांच्या जीवनातील या प्रसंगातून मिळतो. आपले पावित्र्यभंग करण्यासाठी आलेल्या स्त्रीला तुकाराम जो उपदेश करतात त्यातून मानवी जीवन उन्नत करणाऱ्या नीतिविचाराचे दर्शन घडते. 'पराविया नारी रखुमाई समान | हे गेले नेमून ठायीचे चि || जाई वो तू माते न करी सायास | आम्ही विष्णुदास नव्हो तैसे || न साहवे मज तुझे हे यतन | नंको हे वचन दृष्ट वदो || तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार | तरीं काय नर थोडे जाले ||' वासनेने उताविळ झालेल्या स्त्रीला एका पुरुषाची निवड करून लग्न करण्याचा उपदेश तुकाराम करतात. या प्रसंगातून त्यांच्या नैतिक शक्तीचे दर्शन घडते. याबाबत डॉ. किशोर सानप लिहितात. " एखादया महापुरुषाला बदनाम करायचेच असेल तर बदनामीचे परंपरागत शस्त्र असलेल्या छचोर स्त्रीशी रत होण्याची लालसा त्याच्या मनात निर्माण केली जाते, हे तसे जुने तंत्र आहे. तुकोबावरही या तंत्राचा प्रयोग झाला होता. परंतु तुकोबांनी आपल्या आयुष्यातील ह्या मंबाजी

प्रयोगातूनही समाजहिताचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. तुकोबांचे स्खलन करणे तर दूरच, परंतु पापातूनही पुण्याचा मार्ग सांगणारे आणि मानवाला नीतीचा संदेश देणारे, आदर्श समाजपुरुष होते. ''०३ आज गरज आहे तुकामाचे हे विचार समाजात रूजण्याची.

वासनांध लोकांच्या घृणास्पद कृत्यावर प्रहार करतांना तुकारामांच्या शब्दाला विलक्षण धार येते. आपल्याकडे काम करणाऱ्या स्त्रीच्या हतबलतेचा गैरुफायदा घेऊन तिचे लैंगिक शोषण करणाऱ्या व्यक्तीचे पूर्वजही नरकात जात असल्याचे तुकाराम सांगतात. 'दासिचा जो संग करी | त्याचे पूर्वज नरकद्वारी ||' आज विविध कार्यालयात अधिकार पदावरील काही व्यक्तीकडून निम्न स्तरावरील कर्मचारी महिलांचे होत असलेल्या लैगिक शोषणावर आळा घालण्यासाठी सरकारला वेगळा कायदा करण्याची वेळ येते. तेव्हा तुकारामांच्या अभंगाची प्रासंगिकता लक्ष्यात येते. आपल्या पत्नीची वंचना करून परस्त्रीच्या नादी लागलेल्या बाहीरख्याली पुरुषाला 'भोग स्त्रियेसि देता लाजे | वस्त्र दासीचे घेउनि निजे ||' अशा शब्दात तुकाराम खडसावतात. सत्कर्मापासून लांब राहून सतत नवनवीन स्त्रियांच्या शोधात श्वानाप्रमाणे भटकणाऱ्या बाईलवेडया माणसाच्या विसंगत वर्तनाबद्दल संताप व्यक्त करतांना ते म्हणतात. 'साधूच्या दर्शना लाजसी गव्हारा | वेश्येचिया घरा पुष्पे नेसी ||' ज्याप्रमाणे आपल्या पत्नीला सोडून परस्त्रीच्या नादी लागणाऱ्या लोकांचा तुकारामांनी धिक्कार केला तद्वतच आपल्या पतीसोबत व्याभिचार करणाऱ्या चारित्र्यहीन स्त्रीवरही संत तुकारामांनी कोरडे ओढले आहेत. सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने पुरुष आणि स्त्री दोघेही आपले शील सांभाळले पाहिजे यावर तुकारामांचा कटाक्ष आहे. आज महिला संबलीकरणाच्या चळवळी जोर धरत असतांनाच जागतिक बाजारात स्त्रीचे वस्तुकरण झपाट्याने होत आहे. स्त्रीकडे एक माणूस म्हणून न पाहता एक उपभोगाची वस्तु म्हणून पाहिली जात आहे. विविध उपत्पादनाच्या जाहिरातीत होत असलेले स्त्री देहाचे उघडेनागडे प्रदर्शन आणि आता गावोगाव होणाऱ्या सौंदर्यवती स्पर्धेत स्त्री देहाचा मांडला जाणारा बाजार पाहिल्यानंतर देहभावाच्या पलीकडे जावून स्त्रीत्त्वाचा सन्मान करण्याचा जो तुकारामांचा विचार होता त्यापासून आपण नकळतपणे कोसोमैल लांब गेल्याचे निदर्शनास येते.

तुकारामांनी स्त्री संदर्भात व्यक्त केलेले विचार म्हणजे केवळ काल्पनिक आदर्श नसून प्रत्यक्ष व्यवहाराच्या पातळीवर उपयुक्त आहेत. तुकारामांच्या काळात इस्लामी राजकर्त्याच्या प्रभावातून अनेक स्त्रिया ठेवणे किंवा त्यांच्या सोबत लग्न करण्याची प्रथा होती. ही प्रथा सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने जसी अनिष्ठ होते तशीच स्त्रियांच्या स्त्रीत्त्वचा अपमान करणारी होती. एका पुरुषाने सत्ता आणि संपत्तीच्या बळावर अनेक स्त्रिया सोबत विवाह करण्याच्या प्रथेचा तुकारांमानी निषेध केला. 'ज्याच्या घरी दोन नारी | पाप वसे त्याच्या घरी' ही तुकारामांची भूमिका आहे. आज अनेक राज्यात स्त्री जन्मदर घटल्याने पुरषाच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. यामुळे निर्माण झालेल्या गुतागुतीच्या समस्या पाहिल्यानंतर तुकारामांच्या स्त्री विषयक संवेदनांचा व्यापक अवाका लक्षात येतो.

स्त्रीला मिळालेली मौलिक देणगी म्हणजे मातृत्त्व होय. सर्वच संतांनी या मातृत्त्वाचा गौरव केलेला आहे. स्त्रीच्या मातृत्त्वाचा गौरव संत तुकारामांनी आपल्या अभंगातून विविधांगाने केला आहे. परमेश्वरा सोबतचा आपला भावसंबंध प्रकट करतांना आई बद्दलच्या प्रतिमा, प्रतीक, उपमा, दृष्टांताचा समर्पकवापर केलेला आहे. बाळाचे मुख आईच्या हृदयाला

लागल्यानंतर नकळत आईचा पन्हा सुटतो. यातून दोघानाही तृप्ती मिळत असल्याचे तुकाराम सांगतात. मातेचिये चित्तीं | अवघी बाळकाची व्याप्ति || देह विसरे आपुला | जवळीं घेता सीण गेला || दावी प्रेमभाते | आणि अंगावरि चढते || मातेचे अवघे भावविश्वच बाळाने व्यापल्याचे वर्णन करतात. साधु संतांच्या हृदयाचे वर्णन करतांना तुकाराम मातृहृदयाचाच आधार घेतात.

**निष्कर्षात्मक समारोप :-**

संत तुकारामांनी स्त्री पुरुषांना परमेश्वर उपासनेचा समान अधिकार असल्याची उदघोषणा केली. स्त्रीच्या देहधमाशी निगडितअसणारा विटाळ हा नैसर्गिक असल्यामुळे तो त्याज्य नसून मानवी मनातील वासनांधता म्हणजेच विटाळ असून त्यापासून कटाक्षाने लांब राण्याचा संदेश तुकारामांनी दिला. स्त्री ही माया असून परमार्थाच्या मार्गातील धोंड असल्याची जी सनातन धारणा होती त्याला तुकारामांनी छेद दिला. तुकारामांनी स्त्री पुरुषातील नैसर्गिक कामवासनेला नाकारले नसून वासनांधतेचा नाकारले. आपल्या जोडीदारासोबत एकनिष्ठ राहून सयमपूर्वक कामवासनेची पूर्ती करणे तुकारामांना मान्य आहे. पण वासनांधतेने परस्त्री व परपुरुषाबद्दल अभिलाशा बाळगणे पाप असल्याच ते सांगतात. परस्त्री आणि परधन त्यांनी त्याज्य ठरवले आहेत. परस्त्रीच्या मोहाची परिणीती अध:पतनातच होत असल्याचे तुकाराम अनेक अभंगातून सांगतात. स्त्री कडे एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे त्यांचा तुकारामांनी पदोपदी निषेध केला आहे. परस्त्रीकडे मातृत्त्व भावातून पाहण्याचा संदेश त्यांच्या जीवन आणि अभंगातून मिळतो. लिंगभावाच्या पलीकडे जाऊन एक माणूस म्हणून स्त्रीकडे पाहण्याची आणि स्त्रीत्वाचा सन्मान करण्याची एक उदार व्यापक दृष्टी संत तुकारामांच्या अभंगातून मिळते. आज होत असलेले स्त्रीचे वस्तुकरण पाहिल्यानंतर तुकारामांच्या स्त्री विषयक संवेदनांची प्रासंगिकता लक्ष्यात येते.

**संदर्भ सूची :-**

१. ऐसे न सरे तुकोबाचे दान, डॉ. आ.ह. साळुंखे, लोकायत प्रकाशन सातारा. द्वितीयावृत्ती २०१६. पृ.१९.
२. समाज जीवनातील तुकाराम, डॉ. तानाजी राऊ पाटील, संस्कृती प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती २०१६ पृ.११९.
३. समग्र तुकाराम दर्शन, डॉ. किशोर सानप, विजय प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती २००८.

**आधारभूत संदर्भ ग्रंथ:-**

४. विष्णुबुवा जोगकृत सार्थ तुकाराम गाथा, संपादक व्यंकटेश केळकर, मे आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण २०१४.
५. सत तुकारामांचा जीवन विचार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, सुविद्या प्रकाशन कोल्हापूर, द्वितीयावृत्ती २००४.

| | | |
|---|---|---|
| 48 | संत तुकारामांच्या अभंगातील विविध रुपे<br>प्रा. डॉ. रामलीला सुदामराव पवार | 124 |
| 49 | संत तुकारामांचे चिरंतन जीवन चिंतन<br>डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बर | 128 |
| 50 | "महात्मा बसवेश्वरांचे स्त्री उध्दाराचे कार्य"<br>प्रा. संगिता बावगे - ब्याळे | 131 |
| 51 | संतसाहित्याची भूमिका आणि अभ्यास<br>प्रा. डॉ. संजय कुलकर्णी | 133 |
| 52 | "संत तुकाराम: साहित्य व सामाजिक प्रबोधन"<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | 135 |
| 53 | संत तुकारांमाचे मानवी जीवनातील महत्त्व<br>प्रा. सौ. शिल्पा अश्विनकुमार पाटील | 137 |
| 54 | संत ज्ञानेश्वर : शोध आणि बोध<br>शिरशीकर माधुरी मुकुंदराव | 139 |
| 55 | 'साक्षात्कारी संतकवी माणकोजी बोधले'<br>प्रा. शुभदा शिवपूजे - उपासे | 141 |
| 56 | मुस्लिम संत कवींचे योगदान<br>डॉ. सुकुमार दादू आवळ | 143 |
| 57 | नामदेवांची उपदेषवाणी<br>डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे | 145 |
| 58 | 'संत साहित्य आणि समाज प्रबोधन: एक अभ्यास'<br>प्रा. डॉ. उन्मेश भोकडे | 147 |
| 59 | मराठी संत साहित्याच्या निर्मिती प्रेरणा<br>प्रा. डॉ. विजय रेवजे | 150 |
| 60 | भारतीय साहित्यात गोमंतकीय संताचे योगदान<br>प्रा. विनय मडगांवकर | 152 |
| 61 | संत साहित्यातील स्त्री आत्मकथने<br>डॉ. सुवर्णा गुंड - चव्हाण | 155 |
| 62 | संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगातून प्रकट झालेला जीवनानुभव<br>प्रा. राजकुमार नागनाथ नवले | 158 |
| 63 | दत्त संप्रदायाची साहित्य चळवळ आणि समाज परिवर्तन<br>प्रा. एन.व्ही. षिंद | 161 |
| 64 | कृषीतज्ज्ञ संत तुकाराम<br>प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगर | 163 |
| 65 | संत बोधराज महाराज (पोधल्या बुवा), आजंदेकर<br>डॉ. भटू गंगाराम वाघ | 166 |
| 66 | भक्ती परंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान<br>डॉ. गीता सुनिल येर्लेकर | 169 |
| 67 | भक्ती परंपरतेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>श्री. भैरगुंडे एस. एस. | 172 |
| 68 | संत तुकारामांचे सामाजिक कार्य<br>प्रा. दामोदर दगडू बनसोडे | 175 |
| 69 | वारकरी संतांच्या अभंगातील राष्ट्रीय एकात्मता<br>प्रा. डॉ. संभाजी जाधव | 178 |
| 70 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>प्रा. डॉ. कविता मुरुमकर | 181 |
| 71 | संतवाणीतील सांगीतिकता (संत नामदेवांच्या अभंगवाणीच्या आधारे )<br>डॉ. एम. व्ही. कुलकर्णी | 183 |

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# संत तुकारामांचे चिरंतन जीवन चिंतन

**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे,** प्रमुख, मराठी विभाग, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर

Received: 01/01/2018 | Edited: 06/01/2018 | Accepted & Published: 03/03/2018

समग्र मानव जातीचे कल्याण साधण्याच्या भूमिकेतून संत साहित्य आकाराला आले. परमार्थाच्या मार्गावर वाटचाल करतांना आलेली जीवनानुभूती संत साहित्यातून प्रकटली आहे. मानवी जीवनाबद्दल सम्यक चिंतन करून त्यावर संतांनी आपली अर्थपूर्ण प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. यामुळे संतांच्या जीवन चिंतनाला चिरंतनत्त्व प्राप्त झाले आहे. परमार्थ साधनेच्या नावाखाली जीवनापासून पळून न जाता प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधण्याचा संदेश आपल्या कृती आणि उक्तीतून महाराष्ट्रातील वारकरी संतांनी जगाला दिला. याच वारकरी संप्रदायातील संतश्रेष्ठ तुकारामांनी विविध दृष्टीने हे जग आणि जीवन समजून घेतले. मग त्यांना जे जीवन कळाले ते प्रांजळपणे जगाला सांगितले.या संदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात च्तुकोबा केवळ संत आणि केवळ कवी नव्हते. ते जीवनाचा सूक्ष्म दृष्टींनं शोध घेणारे तत्त्वचिंतक होते. म्हणूनच त्यांनी आपल्या कवितांतून जीवनविचार उत्कटतेने मांडला आहे. छ[१] संत तुकारामांच्या अभंगातून जे जीवन चिंतन साकारले त्यातून मानवी जीवनातील चिरंतन सत्याचे दर्शन घडते.

जगातील सर्व तत्त्वचिंतकाच्या दृष्टीने मानवी जीवन म्हणजे एक अजब कोडे राहिले आहे. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी एका हत्तीला समजून घेणाऱ्या सात आंधळया प्रमाणे राहिली आहे. जीवनातील बालपण, तारुण्य आणि वार्धाक्य या तीन अटळ टप्प्या बाबतचे संत तुकारामांचे चिंतन मानवाला अंतर्मुख करून विचार करायला लावणारे आहे. निरागस बालपणात माणसाचे भावविश्व विविध खेळांनी व्यापते. च्बाळपणे ऐसीं वरुषे गेली बारा | खेळता या ारा नानामतें ||ङ बालपणातील या बारा वर्षानंतर तारुण्यात पदार्पण होते. शारीरिक बदल झपाटयाने होऊन जसजसे शरीर बळकट बनते तशी तारुण्याची धुंदी चढू लागते. पूर्वीच्या निरागस आणि निष्पापं मनात वासना विकारांचा नकळत शिरकाव होतो. मन वासनेच्या पूर्तीसाठी सैरभैर धाऊ लागते. विनयाची जागा अहंकार घेतो. यामुळे कुणाचीही पर्वा न करता माणूस स्वतःच्याच मस्तीत स्वैरपणे वावरतो.

> तारुण्याच्या मदें न मानी कोणासी | सदा मुसमुसी खूळ जैसा ||
> अठोनी वेंठोनी बांधला मुंडासा | फिरतसे हौसा जनामधी ||
> हाती दीडपान वरती च मान | नाही तो सन्मान भलियांसी ||
> श्वानाचिया परी हिंडे दारोदारी | पाहे परनारी पापदृष्टी ||
> तुका म्हणे ऐसा थोर हा गबाळी | करिता टवाळी जन्म गेला ||

अ.क्र.३०७२ पृ. ६६८.

तारुण्याच्या मस्तीत माणूस बैला सारखा मुसमुसत फिरतो. डोक्याला मुंडासे बांधून स्वतःच्या तोऱ्यात हुंदडतो. आत्ममग्नता वाढल्यामुळे त्याला बाहेरच्या जगाची फारसी पर्वा वाटत नाही. आई वडिलांच्या सहवासात रमणारा बालक आता आई वडिलांना टाळू लागतो. स्वतःच्या धुंदीत मस्तवाल रेडयासारखा ग ोकात फिरतो. कुणाची फारसी किमत वाटत नाही. हेजीवन केवळ वासनेच्या पूर्तीसाठीच आहे ही तारुण्यातील धारणा असते. काम वासनेच्या पूर्तीसाठी दररोज नवनवीन स्त्रीचा शोध घेत दारोदार कुत्र्यासारखा भटकतो. संत तुकारामांच्या तारुण्य चिंतनाबद्दल वि.रा.चौघुले सांगतात च्तुकारामांच्या मते तारुण्याचा काळ म्हणजे वैभवाचा नि शारीरिक सौख्याचा काळ असला तरी त्यावेळी माणसाचे पतन होण्याचीही शक्यता असते. या वयात अंगात रग असल्यामुळे माणसाला आपण नैतिकतेचे पालन करावे, असे वाटत नाही.छ[२] नीती अनीतीचा विचार सोडून जगातील हव्या असलेल्या गोष्टी उपभोगणं म्हणजेच जीवन अशी तारुण्यातली धारणा असते. यामुळे आपल्या वासनेच्या पूर्तीसाठी तारुण्यात प्रसंगी नीतिमूल्य पायदळी तुडवली जातात. यातून जीवनाची नकळतपणे अधःपतनाकडे वाटचाल होते. म्हणून जो माणूस तारुण्यात जीवनाकडे गंभीरपणे पाहत त्याच्या हातून उत्तुग आणि उदात्त असे काही घडत नाही याची जाणीव संत तुकाराम आपल्या अभंगातून करून देतात. तारुण्यात शरीर बळकट असूनही मन वासनेच्या आहारी गेल्यामुळे सर्व शक्ती वासनेच्या पूर्तीतच खर्च होते. तारुण्याची शक्ती ओसरल्यानंतर जेव्हा हळूहळू वार्धाक्य येते तेव्हा मात्र हातातून सर्वकाही निसटून गेल्याची जाणीव होते. उत्साहाची जागा हताशा आणि वैफल्य घेते. प्रकृती धर्मानुसार आलेले वार्धाक्य क्लेशदायक असते. सर्व आप्तस्वकीयांना हवाहवासा असणारा माणूस वार्धाक्यात सर्वांकडूनच तिरस्कारला, झिडकारला जातो.

> ह्मातारपणी थेटे पडसें खोकला | हात कपाळाला लावुनि बैसे ||
> खोबरियाची वाटी जालें असे मुख | गळतसे नाक श्लेष्मपुरी ||
> बोलों जातां शब्द नये चि हा नीट | गडगडी कंठ कफ भारी ||
> सेजारी ह्मणती मरेना कां मेला | आणिला कंटाळा येणे आह्मा ||
> तुका म्हणे आता सांडुनि सर्व काम | स्मरा राम राम क्षणक्षणा ||

अ.क्र. ३०७३ पृ.६६८.

निरागस बालपण, बेधुंद तारुण्य आणि क्लेशदायक वार्धाक्य या तीन जीवनातील महत्त्वपूर्ण टप्याबद्दल यथार्थ चिंतन संत तुकाराम करतात. तारुण्यात शरीराकडे लक्ष्य न दिल्याने वृद्धावस्थेत ते क्षीण होते. वयोमानानुसार प्रतिकार क्षमता घटल्याने शरीर विविध आजारांना बळी पडते. वारंवार खोकल्याची उबळ येऊ लागते. नाक सारखे गळू लागते.दृष्टी अंधुक होते. कान बधीर होतात.सर्व अवयव निकामी झाल्यामुळे आणि तोंडातील दातही गेल्यामळे धड बोलताही येत नाही. ही अवस्था पाहून घरातल्या प्रमाणे

शेजाऱ्यांनाही कीळस येत असते. आप्त स्वकीयही आपल्या मरणाची वाट पाहतात.

जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचें | अंत हे कळींचे नाही कोणी ||
जाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती | सांडोनि पळती रांडापोरें ||
बाईल ह्मणे खर मरता तरी बरें | नासिलें हे घर थुकोनियां ||
तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी | तुज चक्रपाणी वांचूनियां ||

अ.क्र.२९५६ पृ.६१२.

तारुण्यात सर्वांनाच हवाहवासा वाटणारा माणूस वार्धाक्यात सर्वांकडूनच तिरस्कारला जातो. त्याचा क्षीण झालेल्या व्याधीग्रस्त देहाची सर्वांनाच कीळस येते. ज्यांना या वार्धाक्याची उबग येते त्यांनाही वार्धाक्य अटळच असते. वृद्धावस्थेतील या विदारक वास्तवाची जाणीव संत तुकाराम विविध अभंगातून करून देऊन जीवनाबद्दल अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करतात.ज्या बायका मुलांसाठी आपण आयुष्यभर धावपळ केली तेही शेवटी आपल्या मरणाची वाट पाहतात तेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळालेला असतो. पण हातात काही राहत नाही. संत तुकारामांचे मानवी जीवनाबद्दल केलेले हे चिंतन जगात जन्माला आलेल्या प्रत्येक सर्वसामान्य माणसाला सर्वकाळ लागू पडणारे आहे.

मानवी जीवनातील विविध टप्याची जाणीव तुकाराम आपल्या अभंगातून जसे करून देतात त्याच प्रमाणे जीवनातील अटळ दु:खही नेमकेपणे निदर्शनास आणतात. हे जीवन म्हणजे सुख दु:खाची अखंडित मालिका आहे. सुखाच्या तुलनेत दु:खच वाटयाला जास्त येतात. सुख पाहता जवापाढे | दु:ख पर्वता एवढे || या कटू सत्याची जाणीव संत तुकारामांच्या अभंगातून प्रखरतेने होते. पण याचा अर्थ संत तुकाराम निराशावादी किंवा पलायनवादी नव्हते तर कठोर वास्तववादी होते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून प्रचंड सुख साधणे हाताशी आली असूनही माणसाचे दु:ख आणि समस्या कमी न होता गणितीय श्रेणीत वाढल्या आहेत. समस्या कमी न होता केवळ समस्येचे स्वरूप बदलले आहे. हे वास्तव डोळसपणे पाहिल्यानंतर तुकारामांच्या जीवन चिंतनाची चिरंतनता निदर्शनास येते. मुळात संत साहित्याचे प्रयोजनच चिरंतन सत्याचे प्रतिपादन आहे.जगातील कोणत्याही माणसाच्या जीवनात सर्व दिवस सारखे नसतात. ऊन सावलीच्या खेळाप्रमाणे प्रमाणे जीवनात चढउतार अटळ असतात.

कैं वाहावें जीवन | कैं पलंगी शयन ||
जैसी जैसी वेळ पडे | तैसें तैसें होणे घडे ||
कैं भोज्य नानापरी | कैं कोरडया भाकरी ||
कैं बसावें वाहनीं | कैं पाई अन्हवाणी ||
कैं उत्तम प्रावर्णे | कैं वस्ने तीं जीर्णे ||
कैं सकळ सपंत्ति | कैं भोगणे विपत्ति ||
कैं सज्जनांशीं संग | कैं दुर्जनांशीं योग ||
तुका म्हंणे जाण | सुख दु:ख तें समान || अ.क्र. २८०९ पृ.५८५.

मानवी जीवन साचेबद्ध एकसुरी नसून या जीवनात पदोपदी विविधता आहे. परिस्थितीनुरूप माणसाचें जीवन बदलते. कधी कष्टच कष्ट असतात तर कधी केवळ आरामच आराम. काही वेळा कोणते पक्वान सेवन करावे हा प्रश्न पडतो तर कधी कोरडया भाकरीवर समाधान मानावे लागते. कधी असंख्य वाहने समोर उभी असतात तर कधी वेळ अशी येते की पायपीठ केल्याशिवाय पर्याय नसतो. कधी कोणते भरजरी वस्त्र परिधान करावे हा प्रश्न पडतो तर कधी अंग झाकायला जिर्ण वस्त्रांचीही मारामार असते. कधी प्रचंड ऐश्वर्य तर कधी दारिद्रय असते. कधी संत सजनांची संगत तर कधी दुर्जनही अटळ असतात. जीवन हे चाकोरीबद्ध अखिव रेखिव नसते तर त्यात विविध चडउतार असतात. आणि हे चढउतार प्रत्येकाच्या जीवनात अटळ असतात. या विविधतेमुळेच जीवनात मजा आहे. दु:ख आहे म्हणून सुखाला मोल आहे. जीवनात दु:खच नसेल तर सुख देखील बेचव बनते. चढउतारच नसतील तर जीवनात एक पोकळी निर्माण होते. आणि त्यातून वैफल्य येत असते. या जगात जसे गरीब आहेत म्हणून श्रीमंतांना महत्त्व आहे. तद्वतच दुर्जन आहेत म्हणूनच सज्जनांना महत्त्व आहे. जीवनातील चढउतार आणि चांगल्या वाईटाकडे निरपेक्ष समातोल वृत्तीने पाहण्याची दृष्टी संत तुकारामांच्या अभंगातून मिळते. आपले जीवन आणि सभोवतालेचे जग यथार्थपणे न कळणे यातच आपल्या दु:खाचे मूळ आहे.

जीवनातील काही अटळ गोष्टी निरपेक्षपणे समजून घेणे गरजेचे असते. जगरीती समजून घेणे आवश्यक असते. जेव्हा आपला वैभवाचा आणि उत्कर्षाचा काळ असतो. तेव्हा लांबचे लोकही खूप जवळ येतात आणि जवळचे नाते सांगू लागतात. पण आपल्यावर वेळ वाईट येतो तेव्हा मात्र जवळचे नातलगही सोयिस्करपणे दुरावतात.

बरे जालियाचे अवघें सांगाती | वाईटाचे अंतीं कोणी नाही ||
नोहे मातापिता नोहे कांतासुत | इतरांची मात काय सांगों ||
तुका म्हणे जन दुतोंडी सावज | सापडे सहज तिकडे धरी ||

अ.क्र. ४४३० पृ.८९८.

आपण चांगले तर जग चांगले हे जीवनातील कटू सत्य संत तुकाराम या अभंगातून अधोरेखित करतात. सत्ता, संपत्ती आणि सामर्थ्य आपल्याकडे असे पर्यंत सर्वजन सोबत असतात. पण जेव्हा आपले काही वाईट घडते तेव्हा कुणीही सोबत राहत नाही. सर्वजन सुखाचे सोबती असतात. दु:खात मात्र माणूस एकाकीच असतो. दु:खात काहीवेळा जन्मदाते आई वडील आणि बायका मुले देखिल साथ सोडतात. इतराकडून तर अपेक्षाच करता येत नाही. दुतोंडीसावजा प्रमाणे सोयीनुसार मार्ग निवडणे ही माणसाची मुळ वृत्ती असल्याचे येथे निदर्शनास येते. पैसा हे जीवनाचे साधन असले तरी लौकिक जगांत पैशालाच महत्त्व आहे. धनवंताना जसा समाजात मान असतो तसे कुटुंबातही असते. जो पर्यंत हातात पैसा येतो तोपर्यंतच आई वडील, भाऊ आणि बहीण आपल्या शब्दाला महत्त्व देतात.

धनवंतालागीं | सर्वमान्यता आहे जगीं ||
माता पिता बंधु जन | सर्व मानिती वचन ||
जव मोठा चाले धंदा | तंव बहिण म्हणे दादा ||
सदा शृंगार भूषणें | कांता लवे बहुमानें ||
तुका म्हणे धंन | भाग्य अशाश्वत जाण || अ.क्र. २९०७ पृ.६०४.

लौकिक जीवनातील पैशाचे महत्त्व प्रतिपादन करताना दुसऱ्या एक अभंगात संत तुकाराम म्हणतात. धनवंताना जसे सर्वत्र मान्यता असते तसेच धनंतवंताच्या धनाच्या जोरावर त्यांची कोणतीही कामे थांबत नाहीत. धनवंताचा दरारा समाजात असल्यामुळे तो पैसा खर्च न करताही त्याची काही कामे अगदी सहजपणे होतात. पण निर्धन माणूस पैसा खर्चूनही वेळेवर त्याची कामे होत नाहीत. धनवंतांच्या धनाच्या बळावर त्याचा सर्व व्यापार घरात बसूनच चालतो

आणि निर्धण माणूस दारोदार फिरला तरी त्याचा व्यापार होत नाही. ऐहिक जीवन समृद्ध करण्यासाठी पैशाची गरज असल्यामुळे प्रत्येक क्षणाचा योग्य सदुपयोग करत उत्तमव्यवहार करून पैसा कमवावा. पण पैशालाच जीवनाचे साध्य समजून त्यासाठी रात्रंदिवस धावपळ करीत नीतिमूल्य पायदळी तुडवणे हे संत तुकारामांना पसंत नाही. पैशातून सुखसाधणे पायाशी लोळण घेत असली तरी त्यातून सुख मिळतेच असे नाही. सुख हे बाहयसाधना प्रमाणेच अंत:रिक शांतीवर अवलंबून असते. संत तुकाराम जसे जीवनातील पैशाचे महत्त्व सांगतात तशा पैशाच्या मर्यादाही अगदी मार्मिकपणे स्पष्ट करतात.

धन मेळवूनि कोटी | सर्वे नयें नये रे लंगोटी ||
पानें खाशील उदंड | अंतीं जासी सुकल्या तोंडे ||
पलंग न्याहाल्या सुपती | शेवटीं गोवऱ्या सांगाती ||
तुका म्हणे राम | एक विसरतां श्रम || अ.क्र. ३८२३ पृ.७७७.

जीवनाचे खरे कल्याण साधायचे असेल तर आपल्या धनाचा फारसा उपयोग नसतो. उरफुटे पर्यंत सतत धावपळ करत इतरांना गंडवत कोटयावधी रुपयाचे धन जोडले तरी शेवटी सोबत त्यातील लंगोटसुद्धायेत नयल्याचे सत्य तुकाराम सांगतात. जगजेते सिकंदर सारखी माणसे शेवटी रिकाम्याच हाताने गेल्याचा इतिहास आहे. रावणाकडे एक कोटी तांब्याची तर सात कोटी सोन्याची घरे होती. पण त्यातून त्याचे कल्याण साधले नाही. असा हवाला देऊन सत्कर्म आणि पुण्याईच सोबत येत असल्याचे अंतिम सत्य संत तुकाराम सांगतात. डॉ. यु.म.पठान यांनी स्पष्ट केलेले एकंदर संत साहित्याचे प्रयोजन यादृष्टिंने महत्त्वाचे आहे. च्संत साहित्याचा उगमच मुळी सत्याच्या इतकचं नव्हे तर अन्तिम सत्याच्या शोधासाठी झाला आहे. तुमच्या आमच्या जीवनामागचं सत्य काय, रहस्य काय इथपासून विश्वामागील सत्य कोणतं इथपर्यंत संतांनी नि संतसाहित्यानं विचार केला आहे.छ[०३] धन कमावण्याला संत तुकारामांचा विरोध नाही तर धनालाच सर्वस्व माणून त्याचा अतिहव्यास करण्याच्या प्रवृत्तीला त्यांचा तीव्र विरोध आहे. या संदर्भात तुकारामांच्या भूमिकेचा अन्वयार्थ लावताना डॉ. निर्मलकुमार फडकुले लिहितात च्व्यापार उद्योगाला आणि संपत्ती मिळवण्याला तुकोबांनी विरोध केलेला नाही. उत्तम व्यवहार करून धन जोडावं पण धनलोभाच्या वेटोळयात आणि भोगवादी प्रवृत्तीच्या गरमिठीत सापडू नये ही त्यांची भूमिका आहे. गृहस्थाश्राम चालवतांना धनाची जरुरी असते हे त्यांना कळत होते. पण केवळ पैसा, केवळ उपभोग या गोष्टी आंत्मनाशाला कारणीभूत होतात. म्हणून ईश्वराचं स्मरण ठेऊन गरजे इतकी मर्यादित संपत्ती जोडावी असा विचार त्यांनी मांडला आहे.छ[०४] आपला प्रपंच चालवण्यासाठी नीतिच्या मार्गाने उत्तम व्यवहार करून धन कमवावे आणि ते धन सत्कार्यासाठी सार्थकी लावावे असे तुकाराम आग्रहपूर्वक सांगतात.

जोडोनिया धन उत्तम व्यवहारें | उदास विचारें वेच करी ||
उत्तम चि गती तो एक पावेल | उत्तम भोगील जीव खाणी ||
परउपकारी नेणे परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया ||
भूतदया गाईपशूचे पालन | तान्हेल्या जीवन वनामाजी ||
शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट | वाढवी महत्त्व वडिलांचे ||
तुका म्हणे हे चि आश्रमाचे फळ | परमपद बळ वैराग्य ||
अ.क्र. २८५४ पृ.५९४.

ऐहिक जीवन सुखाने जगण्यासाठी सन्मार्गाने संपत्ती कमवावी. तीसंपत्ती अनासक्तपणे समाजहितार्थ खर्च करावी. त्यातच जीवनाचे कल्याण आहे. कारण संपत्तीचा कितीही संचय केला तरी आपल्या पश्चात त्या संपत्तीचा तिळमात्र उपयोग नसतो. वाटलेली संपत्ती ही आपली होते तर साटवलेली संपत्ती ही दुसऱ्याचीच होते. म्हणून आपली संपत्ती परोपकारार्थ निरपेक्षपणे खर्च करावी. त्याचबरोबर आपल्या मुखाने कुणाची निंदा न करता परस्त्रीकडे पवित्र भावाने पहावे. भूतदया हृदयात ठेवून गाई पशूचे पालन करावे. भुकेल्याला अन्न आणि तहाणलेल्याला पाणी देऊन आपल्या आई वडिलांच्या कीर्तीमध्ये भर घालणे यातच जीवनाचे साफल्य असल्याचे संत तुकाराम सांगतात. या अभंगातून संत तुकाराम समतोल जीवनाचा आदर्श जगासमोर ठेवतात.

**निष्कर्षात्मक समारोप :-**

संत तुकारामांच्या अभंगातून मानवी जीवनातील चिरंतन सत्याचे दर्शन घडते. निरागस बालपण, आत्मकेंद्रित स्वैर तारुण्य आणि क्लेशदायक वार्धाक्याबद्दलचे विविधांगी चिंतन या अभंगातून साकारले आहे. जीवन म्हणजे केवळ आनंदयात्रा नसून सुख दु:खाची अखंडित मालिका असल्याची जाणीव करून देऊन याकडे समान दृष्टिकोणातून पाहण्याचा संदेश संत तुकाराम देतात. जीवनातील विविध टप्याबरोबरच जगरीतीबद्दलचे संत तुकारामांचे चिंतन मौलिक स्वरूपाचे आहे. जोपर्यंत आपल्याकडे सत्ता, संपत्ती आणि सामर्थ्य आहे तोपर्यंतच या जगात आपल्याला महत्त्व असते. या जगात माणसापेक्षा सत्ता आणि संपत्तीला अधिक महत्त्व आहे, या कटू सत्याची जाणीव संत तुकारामांच्या अभंगातून होते. आपल्या उत्कर्षाच्या काळात सोबत असणारे प्रतिकुल काळात मात्र नकळत लांब जातात. लौकिक जगात धनाला महत्त्व असल्यामुळे सगळीकडे धनवंतालाच प्रतिष्ठा मिळते. पण केवळ धनाच्या पाठीमागे लागून मानवी जीवनाचे सर्वार्थाने कल्याण होत नाही. कमावलेले धन शेवटी सोबत येत नसून आपली आपली किर्ती तेवढीच शिल्लक राहते. प्रपंचातील धनाचे महत्त्व लक्षात घेऊन नीतीच्या मार्गाने उत्तम व्यवहार करून धन कमवावे. अतिरिक्त संपत्तीचा विनीयोग सत्कार्यासाठी करून आपल्या पूर्वजांच्या किर्तीत भर घालावे असे संत तुकाराम सांगतात. प्रपंच आणि परमार्थ यांचा सुवर्णमध्ये साधून समतोल जीवनाची वाटचाल करण्याची दिशा संत तुकारामांच्या अभंगातून मिळते.


**संदर्भ सूची :-**

१. संत तुकारामांचा जीवन विचार, निर्मलकुमार फडकुले, सुविद्या प्रकाशन सोलापूर, द्वितीआवृत्ती २००२. पृ.०१.
२. संत समाज आणि अध्यात्म, वि.शं, चौघुले, संधिकाल प्रकाशन, भाईंदर, पूर्व. द्वितीयावृत्ती २०१५.पृ.३०.
३. मध्ययुगीन संत साहित्य : काही आयाम ,डॉ. यु.म. पठाण, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००३. पृ. २५.
४. संत तुकारामांचा जीवन विचार, उनि. पृ. ७२.

**अधारभूत ग्रंथ :-**

१. जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराम महाराज संस्थान. श्री.क्षेत्र देहू, पुर्नआवृत्ती २०१३.

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Issue – 114 (B)

## Recent Trends in Research

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Issue 114 (B) - Recent Trends in Research
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
January-2019


| | | | |
|---|---|---|---|
| | | डॉ. शिवाजी वाघमोडे | 286 |
| 65 | तुकोजी होळकर | डॉ. सूर्यवंशी दीपक | 291 |
| 66 | मराठा समाज सद्यस्थिती व आरक्षण | डॉ. प्रशांत पगाडे | 294 |
| 67 | ग्रंथालयातील आधुनिक सुरक्षा प्रणाली | | |
| 68 | अवर्षणप्रवण मान आणि खटाव तालुक्यातील पर्यटन स्थळे : एक भौगोलिक आढावा | डॉ. सुधीर इंगळे आणि श्री राहुल चौरे | 298 |
| | | डॉ. रेखा वडीखाये | 304 |
| 69 | ग्रामविकासाची गाथा-ग्रामगीता | डॉ. गणेश टाले | 307 |
| 70 | भटक्या-विमुक्तांची आत्मकथने एक अध्ययन | डॉ.रविंद्र बेम्बरे | 311 |
| 71 | संत तुकारामांच्या दृष्टीकोनातील संत | विनोद डौले | 314 |
| 72 | भारतातील लोकशाही व्यवस्था व राजकीय पक्षांतर एक अध्ययन | डॉ. व्ही.ए गाजरे | 318 |
| 73 | उच्च शिक्षणापुढील आव्हाने | उन्मेष शेकडे | 321 |
| 74 | मानव अधिकार : स्वरूप विवेचन | प्रा. शरद गायकवाड | 324 |
| 76 | स्त्री भ्रूणहत्या एक सामाजिक समस्या | | |
| 77 | आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरेतील कला, लोकनृत्य आणि लोकसाहित्य : एक अभ्यास | प्रा. सरला आरबोळे | 327 |
| | | डॉ. आनंद बारके | 331 |
| 78 | जयवंत दळवी यांच्या नाटकातील मनोविश्लेषण | | |
| | **कोंकणी विभाग** | | |
| | | सत्यवान नायक | 336 |
| 79 | ओपिनियन पोलांतलीं कोंकणी कविता : एक चिकित्सक अभ्यास | दिपराज सातोर्डेकर | 349 |
| 80 | झीलवा राणो नाटकांतलीं विशेशांगां : एक चिकित्सक अभ्यास | | |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Issue 114 (B) - Recent Trends in Research
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील संत

**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे**
प्रमुख, मराठी विभाग,
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर जि.नांदेड

महाराष्ट्र भूमी साधु-संत, महंताची पूण्यभूमी म्हणून प्राचीन काळापासून सुपरिचीत आहे. नाथ, महानुभाव, वारकरी, वीरशैव, दत्त, समर्थ, इ. संप्रदायातील अनेक संतानी जगाच्या कल्याणा। संताच्या विभूती। देह कष्टविती। परोपकारे।। या अभंगोक्ती प्रमाणे महाराष्ट्राच्या लौकिक आणि पारलौकिक जडणघडणीसाठी आपले संपुर्ण आयुष्य झिजवले. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राची मुळं या संताच्या शिकवणुकीतच सापडतात. पण आज मात्र संत चिन्हे लेवुनि अंगी । भुषण मिरविती जगी या अभंगोक्ती प्रमाणे संतत्वाचा केवळ बाह्य देखावा करुन नानाप्रकारची सोंगे घेऊन व युक्त्या क्लृप्त्या लढवून संतत्वाचे प्रदर्शन करणाऱ्या असंताचा खरे साधु संत। बैसले सांधीत। लबाडाने मत्त। माजविले।। या संतोक्ती प्रमाणे समाजात सुकाळ झालेला आहे. अशा ढोंगी, भोंदू असंताकडून फसवणूक झाल्याच्या बातम्या प्रसार माध्यमाकडून रोज ऐकायला पाहायला मिळत आहेत. त्यामुळे आज संत कोणास म्हणावे ? हा प्रश्न समाजासमोर उपस्थित होत आहे. या प्रश्नाचे अचूक उत्तर शोधण्यासाठी संतसाहित्याकडेच वळले पाहिजे.

प्रत्येक संप्रदायातील संतानी आपल्या साहित्यातून संत कोणास म्हणावे? या विषयी चिंतन केले आहेत. आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाने वारकरी संप्रदायाच्या कळसाच्या स्थानी विराजमान झालेल्या संत तुकारामांनी आपल्या अंभगातून संत चिंतनाचा कळसच गाठला आहे. अवतार तुम्हा धरावया कारण। उध्दारावे जन जडजीव संतांचा जन्म जडजीवाला पारमार्थिक दिशा दाखवून त्यांचा उध्दार करण्यासाठी असतो. असे संत तुकाराम संताच्या अवतार कार्याविषयी सांगतात. संत कोणास म्हणावे हे स्पष्ट करताना संत तुकाराम बहिरंगापेक्षा अंतरंगावर भर देतात. स्वतःला संत समजून संतत्वाचा केवळ बाह्य देखावा करणाऱ्या असंताची लक्षणे संत तुकारामांनी आपल्या अभंगातून आवर्जून आणि गर्जून सांगितले. अशा ढोंगी असंताच्या दांभिकतेचा पर्दापाश संत तुकाराम आपल्या अनेक अभंगातून करतात.

**काम क्रोध लोभ चित्ती। वरि वरि दाविती विरक्ती ।।**
**अशा पाशी बांधोनि चित्त । म्हणती झालो आम्ही मुक्त ।।**

अंगी कुठलेही सद्‌गुण नसलेले दया धर्म नाही चित्ती। हे जाणावे भोंदू असे विकाराधीन ढोंगी भोंदू लोक नानाप्रकारची सोंगे घेऊन व युक्त्या, क्लृप्त्या लढवून आपण संत आहोत, साधु, बैरागी, योगी आहोत; आपल्या जवळ अलौकिक चमत्कार सामर्थ्य आहे असे भासवून भोळया लोकांना नादी लावतात. आपली धनलालसा आणि कामवासना तृप्त करून घेतात. यामुळे सामान्य भोळ्या लोकांची फसवणूक होते. अशा भोंदू लोकांच्या चमत्काराला पाहून त्यांना संत समजू नये. चमत्कार करणे, शकून सांगणे, ही संताची लक्षणे नाहीत. असे संत तुकाराम म्हणतात अशा ढोंगी दांभिक असंतापासून दूरच राहण्यास संत तुकाराम आपल्या अभंगातून परोपरीने सांगतात.

**ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनी म्हणती साधु।।**
**तुका म्हणे सांगो किती। जळो तयाची संगती ।।**

अशी दांभिक असंताची लक्षणे सांगितल्यानंतर संत कोण ? याचे विवेचन करताना आपल्या अभंगात विषय सुखात रंगलेल्या पतिताना आणि अतिवदुःख देन्याने गांजलेल्या दीन दुबळ्या लोकांना जो उदारपणे जवळ करतो तो संत अशी व्याख्या संत तुकाराम करतात. अशा संतांचे चित्त लोण्याप्रमाणं अंतर्बाह्य सहानुभूतीने आणि प्रेमाने ओथंबलेलं असते. ते संत निराधारांचे आधार असतात. पोटच्या मुलाएवढंच परक्या नोकरावरही प्रेम करतात.

**जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।**
**तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।**

संतासाठी सज्जन हा पर्यायी शब्द संत तुकाराम अनेक अभंगात वापरतात. संतांच्या अंतःकरण प्रवृत्तीचं वर्णन करताना तुकाराम आपल्या अभंगातून चंदन, दीपक, परीस, आणि साखर ही चार प्रतीकं प्रामुख्याने वापरली आहेत. चंदनाचे झाड मुळापासून शेंड्यापर्यंत चंदनरूप असते. सुंगधाने ओंथबलेले असते. कुऱ्हाडीचा घाव घालणाऱ्यालाही चंदन आपल्या अंतरंगातला प्रेमाचा गंध देतो. दिवा हा सर्व बाजुने प्रकाशरूप असतो. त्याला मागेपुढे कुठेही अंधार

नसतो.परिसाची प्रत्येक बाजू सारखीच सामर्थ्यवान असते. साखर सर्वांगानी गोड असते. त्याप्रमाणे संत सर्वार्थानी सत्प्रवृत्तीचे असतात असे संत तुकाराम सांगतात.

**चंदनाचे हात पाय ही चंदन। परीसा नाही हीन कोणी अंग।।**
**दीपा नाही पाठी पोट अंधकार। सर्वांगे साखर अवधी गोड।।**
**तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पाहता अवगुण मिळेचिना।।**

संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेला संताविषयीचा हा दृष्टिकोन स्पष्ट करताना डॉ. निर्मलकुमार फडकुले लिहितात "संत सज्जन सर्वार्थांनी सत्प्रवृत्तीचे असतात. सज्जनता हा त्यांचा आत्मधर्म असतो. त्यात कधीही परिवर्तन होणार नसते. धरणी दुभंगली किंवा मस्तकावर आकाश कोसळलं तरी संत सज्जनांच्या चित्तातली सद्‌गुणांची वस्ती कधीच उठून जात नाही. संत सज्जनांच्या स्वाभाविक प्रवृत्तीवर तुकोबांनी केलेलं हे भाष्य खरतंर त्यांच्या स्वानुभवातूनच त्यांना स्फुरलेलं आहे." शुध्द बीज असलं म्हणजे त्यातून रसमय गोमटी फळं आपोआप उत्पन्न होतात. या न्यायानेच संतांच अंतःकरण शुध्दच असंत. त्यांच्या मुखात अमृताची वाणी सामावलेली असते. आणि आपला देह ते परमार्थासाठी झिजवतात. संताच्या वृत्तीत आणि कृतीत कडवटपणाचा लेशही नसतो. यामुळे यांच्या दर्शनाने पापताप आपोआप नाहीसे होतात असे तुकाराम अभंगात सांगतात.

**गंगाजळा पाही। पाठी पोटी नाही।अवगुण काही । अमृतासी।।**
**तुका म्हणे तैसे। जाणा संतजन। सर्वत्र संपुर्ण गगन जैसे।।**

अशा प्रकारे संत तुकारामांनी अनेक अभंगातून संताच्या सद्‌गुणाचे वर्णन केले आहे. संत तुकारामांच्या वरील अभंगातील संत लक्षणाचे विवेचन करताना रवींद्र पिंगे म्हणतात " संत गंगाजळा सारखे पवित्र, अमृतासारखे गोड आणि संजिवक, सुर्यासारखे ज्ञानरुपी प्रकाश देणारे. कापरा सारखे सत्वशील. सागरासारखे परिपुर्ण, परिस चिंतामणी सारखे सुखद गगणाप्रमाणे सर्वदूर समभावाने वागणारे असतात." संत तुकारामांच्या अभंगातील शब्दाशब्दातून संताच्या स्वभावातील दयाळूपणा, माउली सारखा कनवाळूपणा, प्रेमळपणा, इहलोकातील जडजीव उध्दाराची तळमळ समत्वभाव इत्यादी गुण व्यक्त होतात. संत तुकाराम संताच्या सद्‌गुणाचे विवेचन करताना आपल्या अनेक अभंगात म्हणतात.

**भुताची दया। भांडवल संता।आपुलीचा ममता। नाही देही ।।**

किंवा

**दया संता भांडवल। वेची बोल उपकार।।**

किंवा

**संताचिया गावी। प्रेमाचा सुकाळ। नाही तळमळ। दुःख लेश।।**

किंवा

**लेकराची हीत । वाहे माऊलीचे चित्त।।**
**ऐसी कळवळयाची जाती। करी लाभाविण प्रिती।।**

संताची अनेक लक्षणे सांगितल्यानंतर संतत्व हे किती अनमोल असते. हे सांगताना संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात. संतत्व ही बाहेरुन मिळणारी पदवी नव्हे. संतत्व हा अंतःकरणाचा गुणधर्म आहे. संतत्व ही एक वृत्ती आहे. जीवन जगण्याची ती एक प्रवृत्ती आहे. बाह्य आवडंबराने संतत्व येत नाही. कितीही मूल्य दिले तरी संतत्व बाजारात विकत मिळत नाही. संपत्तीच्या अनंत राशी ओतल्या तरी संतत्व भेटत नाही. संतत्व ही एक उच्चप्रतिची मानसिक अवस्था आहे.

**नाही संतपण मिळ हे हाटी। हिंडता कपाटी रानी वनी ।।**
**नये मोल देता धनाचिया राशी। नाही ते आकाशी पाताळी ते।।**

आपल्या वासनाविकारावर विजय मिळवलेल्या स्व चा विसर्जन केलेल्या संताच्या संतत्वाचे वर्णन ते अनेक अभंगातून करतात. प्रत्येक माणसाच्या अंतरंगात परमेश्वर असतो. पण वासनाविकाराधीन होऊन सदविवेक विसरल्याने अंतरंगातल्या परमेश्वराची जाणीव त्यास होत नाही. अशा लोकांची सदविवेक बुध्दी जागृत करून त्याच्या अंतरंगातील परमेश्वराचे दर्शन घडण्याचे काम संत करतात. अशा संताविषयी कृतज्ञताभाव व्यक्त करताना संत तुकाराम म्हणतात.

**काय सांगो आता। संताचे उपकार| मज निरंतर। जागविती।।**

काय दयावे त्यासी। व्हावे उत्तराई | ठेविता हा पायी। जीव थोडा।।

संत तुकारामांच्या दृष्टिकोनातून लक्षावधी तीर्थाटनापेक्षा संत संगती महत्वाची आहे. परमेश्वर हा तीर्थक्षेत्रातल्या दगड धोंड्यात किवा तेथील पाण्यात नसतो. म्हणून तीर्थक्षेत्रातल्या पाण्यात स्नान करून दगडाची पूजा केल्याने परमेश्वर भेटत नाही. परमेश्वर सज्जनाच्या अंत:करणात असतो. अशा संत सज्जनांच्या सहवासातच परमेश्वराचे दर्शन घडते असे संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात.

तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी।।
मिळालिया संत संगत। समर्पिता भले अंग।।

अशा अनेक अभंगातून संत तुकारामांचा संताविषयीचा तर्कशुध्द बुध्दिवादी दृष्टिकोन व्यक्त होतो. इहलोकातील संताचा महिमा वर्णन करताना संताचा महिमा। बहु तो दुर्गम। शाब्दिकाचे काम। नाही येथे।। अशा तऱ्हेने शब्दही अपुरे पडणार असल्याचे संत तुकाराम सांगतात. संताच्या अंत:करणातच परमेश्वर असल्याने संत तुकारामांना मंदिरातील दगडा आणि धातुच्या निर्जिव देवापेक्षा संत महत्वाचे वाटतात. संत चरणी ठेविता भाव। आपोआप भेटे देव असे संत तुकाराम दृढ आत्मविश्वासाने सांगतात. दगडाच्या देवाची पुजा करुन वेळ, पैसा वाया घालवण्यापेक्षा संत संगती महत्वाची आहे. हे सांगताना ''संताचा अतिक्रम। देवपुजा तो अधर्म''असे अभंगात म्हणतात. देव पूजेपेक्षा संत पूजा महत्वाची हे सांगून संताच्या पूजेचे स्वरूप स्पष्ट करताना संत तुकाराम अभंगात म्हणतात.

शुध्द चर्या हेचि। संताचे पूजन।
लागताची धन। नाही वित्त।।

संताची पूजा म्हणजे केवळ शुद्ध आचरण;सद्वर्तन संतसंगतीत राहून संताची अशी पूजा केल्याने एकदा अग्नित गेलेली वस्तू ज्याप्रमाणे आग्निरूप होते. त्याचप्रमाणे संताच्या सहवासात गेलेला पतित पामर जीव संतरूपच होतो. असे संत संगतीचे महत्व संत तुकाराम आपल्या अभंगातून सांगितले.

**निष्कर्षात्मक समारोप :-**

संत तुकारामांच्या संत विषयक दृष्टिकोनावर संत ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताई आणि संत एकनाथांच्या संत विषयक दृष्टिकोणाचा प्रभाव काही प्रमाणात जाणवतो. साधू संतांचे वेश धारण करून भोंदू लोक समाजाचे शोषण करीत असल्यामुळे अशा भोंदूंची लक्षणे सांगून त्यांच्यावर संत तुकारामांनी परखड प्रहार केला आहे. कुठल्याही बाह्यवेशभुषेवरून कुणी साधु ठरत नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. संतत्वाची उपाधी कुठल्या बाजारात मिळत नसून ती एक अखंडित साधना आहे.संतत्व हा बहिरंगाचा देखावा नसून तो अंतरंगाचा गुण आहे. यावर तुकारामांनी भर दिला. संत स्वतः सदाचाराच्या मार्गावर वाटचाल करून समाजासमोर आदर्श प्रस्थापित करतात. आपल्यातील देवत्वाची जाणीव संतांच्या संगतीमध्ये गेल्यानंतर होते. म्हणून तीर्थयात्रेपेक्षा तुकारामांना संत संगती महत्त्वाची वाटते. म्हणून प्रसंगी देवाची पूजा बाजूला ठेऊन संतांची पूजा केली पाहिजे असा तुकारामांचा आग्रह आहे. संताची पूजा म्हणजे कुठले कर्मकांड नसून केवळ सदाचाराचे वर्तन करणे तुकारामांना अभिप्रेत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. संत तुकारामांचा जीवन विचार, निर्मलकुमार फडकुले, सुविद्या प्रकाशन सोलापूर, द्वितीयावृत्ती २००२. .
२. संत समाज आणि अध्यात्म, वि.शं. चौधुले, संधिकाल प्रकाशन, भाईंदर, पूर्व. द्वितीयावृत्ती २०१५.
३. मध्ययुगीन संत साहित्य : काही आयाम ,डॉ. यु.म. पठाण, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००३.
४. जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री.क्षेत्र देहू, पुर्नआवृत्ती २०१३.
५. चार भावंडे, डॉ. सदानंद मोरे, गंधर्व वेद प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २०१८.
६. संत तुकाराम अर्थात तुकारामबावांचे चरित्र, कृष्णराव केळुसकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. तिसरी अवृत्ती २०१७.

| | | |
|---|---|---|
| 66 | लोकशाहीचा आधार गांधी विचार **जोतिराम माने** | 319 |
| 67 | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार आणि सद्यस्थितीतील भारतीय लोकशाही **डॉ.वनिता साबळे-चव्हाण** | 321 |
| 68 | महाराष्ट्रातील कुक्कुटपालन व्यवसायाची सद्यस्थिती आणि व्यवस्थापन **डॉ.सुधाकर जाधव व अभिजीत भामरे** | 325 |
| 69 | रविंद्र शोभणेची 'सव्वीस'दिवस : संघर्ष व सर्जनाच्या पाऊलखुणा **प्रा.संजय गोहणे** | 331 |
| 70 | सामाजिक न्याय – महिला आरक्षण **डॉ. शोभा चौधरी** | 341 |
| 71 | भारतातील जातीव्यवस्था आणि जाती निर्मुलन विषयक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार **डॉ.पद्माकर दारोंडे** | 344 |
| 72 | टू सर, विथ लव्ह – ई. आर ब्रेथवेट (अनुवाद : लीना सोहोनी) **डॉ. दीपक गायकवाड** | 348 |
| 73 | वाटचाल माझ्या देशाची **डॉ. अनिता वाळके** | 353 |
| 74 | वीरगळ संग्रहालय : वेळापूर **डॉ. संजय वाघमारे** | 358 |
| 75 | जयवंत दळवी यांच्या नाटकांतील मनोविश्लेषण **डॉ. आनंद वारके** | 364 |
| 76 | मानवधिकार आणि कामगार (Human Rights and Workers) **प्रा.बालाजी घुटे** | 370 |
| 77 | महिला सबलीकरण व पंडिता रमाबाई **डॉबावलगावे .चंदन एम .** | 375 |
| 78 | क्रीडा क्षेत्र आणि महिला **डॉ.विजय पडवळ** | 379 |
| 79 | श्रीमती इंदिरा गांधी : व्यक्ती आणि कार्य **डॉ. महेश गोमासे** | 381 |
| 80 | नैसर्गिक आपत्ती आणि शेती व्यवसाय एक विशेष अभ्यास **प्रा. दत्तू टाकोळे** | 384 |
| 81 | महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंगगुणोत्तराचा चिकित्सक अभ्यास **डॉ. सुदर्शन सोनवणे** | 389 |
| 82 | संत संकल्पना व स्वरूप **डॉ. रविंद्र बेम्बरे** | 395 |
| 83 | महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक विचारातील स्त्रीवाद : एक अभ्यास **प्रा. महानंदा राऊतखेडकर** | 400 |
| 84 | शास्त्रीय संगीतातील महिलांचे कार्य **प्रा. सौ. दिपाली पांडे** | 404 |
| 85 | राज्यविहीन समाज व आदर्श राज्य अहिंसा प्रधान राज्याची कल्पना **डॉ.महेश मोटे** | 409 |
| 86 | दुसरे इंग्रज – मराठा युद्धात नबाव सालाबतखाँची भूमिका **डॉ.संदिप राऊत** | 413 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

ISSN – 2348-7143

Impact Factor – 6.261

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue –165 (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

Price : Rs. 800/-

© All rights reserved with the authors & publisher

Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# संत संकल्पना व स्वरूप

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे
प्रमुख, मराठी विभाग,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

भारतभूमी ही साधू संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. भारतीय संस्कृतीच्या जडण घडणी संतांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. यामुळे भारतीय समाज हा साधुसंताकडे विलक्षण आदरभावाने पाहतो. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा उचलण्यासाठी साधुत्वाचा बाजार मांडून समाजाचे शोषण करणारे दांभिक साधुसंत मोठया प्रमाणात येथे आढळतात. अशा वेशधारी दांभिकाकडून अनेक वेळा फसवणूही होतो. यामुळे संत कुणाला म्हणावे ? खरा संत कसा ओळखावा? याबद्दल समाजात मोठया प्रमाणात संभ्रम पहायला मिळतो. या पार्श्वभूमीवर आपल्या विविध कोशवाङ्मयात साधू आणि संताबद्दल जो विचार प्रकटला त्या अधारे संत संकल्पनेचा मागोवा घेऊन अभ्यास करणे उचित ठरते. यादृष्टीने संत संकल्पनेचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

## मराठी व्युत्पत्ती कोश :-

संत शब्दाचा व्युत्पत्तीच्या दृष्टीने मराठी व्यत्पत्ती कोशात विचार केला आहे यातून संत संकल्पना स्पष्ट होते. च साधू, पुण्यपुरुष, ईश्वराला जाणणारा, शांत, स्थिर, नित्य, शांत a saint, a holi person calm, quit छ01असे सांगितले आहे. सदैव पुण्यप्रद कामात मग्न असणारा, परमेश्वरांची निरंतर उपासना करून त्याचे स्वरूप जाणणारा आणि मनाने जो सदैव शांत आणि स्थिर आहे त्याला साधू असे संबोधले आहे. शांतचित्त ईश्वरशरण माणूस म्हणजे संत असा अर्थ येथे अभिप्रेत आहे. साधू आणि संत शब्द समान अर्थाने वापरण्यात आला आहे. च साधू शब्दाचा अर्थ पवित्र, सात्विक, सरळ, चांगले, सज्जन, मनुष्य, संत. holy, sincere, pure, simple, a saint असा दिला आहे.छ02 यातून सरळमार्गी सदाचारी ईश्वरशरण व्यक्ती या अर्थाने साधू आणि संत शब्द वापरले जातात.

## राजहंस व्यावहारिक मराठी शब्दकोश :-

चसंत म्हणजे धर्माने चालणारा सदाचारी मनुष्य ; पुण्यपुरुष, सज्जन, सत्पुरुष साधू होय. छ03 पृ.641 धर्माने सांगितलेल्या मार्गानुसार आपल्या जीवनाची वाटचाल करणाऱ्या सज्जन, पुण्यवान सत्पुरुषाला संत आणि साधू असे संबोधले आहे. साधुसंत म्हणजे संसारिक मोहातून बाहेर पडून ईश्वरसाधनेत आयुष्य घालणारे लोक म्हणजे साधू असे सांगितले आहे.

## अभिनव मराठी - मराठी इंग्रजी पर्याय कोश :-

मराठी - मराठी इंग्रजी पर्यात कोशात संत व साधू शब्दाला दिलेल्या विविध पर्यायातून साधुसंत शब्दाची व्याप्ती स्पष्ट होते. चसंत - सत्पुरुष, पुण्यपुरुष, साधुपुरुष, देवमाणूस, धर्मराज, धर्मावतार, धर्मात्मा, भगवद्भक्त, saint, oietist, apostle छ04 संता प्रमाणेच साधू बद्दल सांगतात. चसाधू - ऋषी, मुनी, योगी, सिद्धपुरुष, द्रष्टा, मुमूक्षू, साधक, यती, तपस्वी, जोगी वैरागी, संन्यासी, संत, महात्मा, सत्पुरुष, हरिदास, भगवदभक्त, महंत, मलंग, जिन, तीर्थंकर, अर्हत, श्रावक, भिक्षु, क्षपणक, लामा, फकीर, पीर, अवलीया, फटींग, बाबा, बुवा, साध्वी, योगिनी, जोगीन, जोगतीन, सती. छ05 यातून संत या शब्दापेक्षाही साधू हा शब्द अधिक व्यापक अर्थाने वापरण्यात आल्याचे लक्षात येते. जनमनातील साधू संकल्पनाच येथे अभिव्यक्त झाली आहे. चित्ताची स्थिरता या अर्थाने साधुवृत्ती हा शब्द वापरला आहे.

ISSN : 2348-7143
February-2019

**भारतीय संस्कृती कोश :-**

भारतीय संस्कृती कोशामध्ये साधूंची काही लक्षणे विस्ताराने सांगितली आहेत. "साधू- बैरागी भिक्षेकऱ्याचा एक वर्ग. लांब केस व दाढी मिश्या वाढलेल्या, अंगाला राख फासलेली, भगवी कफनी, छाटी किंवा लंगोटी, गळयात रुद्राक्षाच माळा, दंडात लोखंडी कडी आणि हातात चिमटा किंवा त्रिशुळ असा यांचा पेहराव असतो. कोणी डोक्यावर जटांची गाठ बांधतात, तर कोणी पाठीवर जटा लांब सोडतात. काही साधू पूर्ण मुंडण केलेले असतात. काही साधू केवळ लंगोटी घालतात. तर काही साधू पूर्ण नग्न राहतात. कोणी दंडाला घंटा बांधतात, तर कोणी गळयात लिंग बांधतात. कोणाजवळ शंख असतो, तर कोणाच्या तोंडावर व अंगावर निरनिराळया आकृती काढलेल्या असतात. तर कोणाच्या कपाळी गंधाच्या रेषा असतात; शेंदुराचा टिळाही असतो. अशी यांची विविध रूपे काही अंशी भयप्रदच असतात..... बहुतेक सर्व साधू व्यसनी असून ते भांग पितात व गांज्या ओढतात."06 यातून साधू म्हणून वारणाऱ्या व्यक्तीच्या केवळ बाह्यवेशाचेच वर्णन केलेले आहे. सज्जन, परोपकारी, देवभक्त आणि साक्षात्कारी अशा माणसांना साधूसंत म्हणतात. असेही या कोशातून सांगितले आहे. भारताच्या भिन्न भिन्न भागातील या संतांच्या जीवनात आचार- विचारात व आध्यात्मिक साधनेत विविधता आढळते. त्याच प्रमाणे आपल्या धर्म संप्रदायाच्या तत्त्वज्ञान आणि आचारधर्मानुसारही साधूंची वेशभुषा आणि पेहराव असतो. त्यांची जीवनशैली आणि दिनचर्या असते. हिंदू साधूंचे जे वर्णन केलेले असते ते बौद्ध, जैन, शिख, लिंगायत आणि सुफी यांना लागू पडत नाही. त्यांच्या आत्मज्ञान आणि मोक्षाच्या धारणाही आपल्या संप्रदायानुसार भिन्न असतात. संस्कृती कोशात साधुंच्या बद्दल जे वर्णन आले आहे. ते हिंदू साधूना अधिक प्रमाणात लागू पडणारे आहे.

**मराठी विश्वकोश :-**

मराठी विश्वकोशातूनही ईश्वरनिष्ठ, सदाचारी, पुण्यवान, अनासक्त आणि विरक्त वृत्तीच्या माणसाला संत आणि साधू असे संबोधले आहे. "ईश्वरनिष्ठ, पुण्यशील, सदाचरणी, निर्वैर, निरपेक्ष, निःसंग त्यागी आणि निष्काम अशा व्यक्ती. संत म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीच्या जीवनाकडे हे सदगुण दिसून येतात. संतांची जीवने आदरणीय अनुकरणीय मानली जातात."07 ज्यांच्या बद्दल समाजाला आदर वाटतो आणि ज्यांची प्रत्येककृती अनुकरणीय असते तोच व्यक्ती म्हणजे संत असे विशद करून या विश्वकोशात संत संकल्पना स्पष्ट करतांना पुढे लिहितात, "कोणत्याही धर्मात संत म्हणून मान्यता पावलेली व्यक्ती त्या धर्मातील सर्वोच्च मूल्यांचे आविष्कार आपल्या जीवनातून घडवित असतात. संत हे अनुकरणीय मानले गेले असले तरी त्यांची अनुकरणीयता आणि त्यांचे अनुकरण करण्याच्या आपल्या क्षमतेच्या मर्यादा हयातील ताण सामान्यांना जाणवत असतो. अनेक संत लोकात मिसळत असतात, आपल्या संतत्वाचा गर्व न वाहता त्याच्या सुख दुःखाशी समरस होतात. तेव्हा एकीकडे सामान्याना ते आपल्यासारखेच वाटतात; पण दुसरीकडे संताचे आपल्याहून वेगळेपणाही त्यांना जाणवत राहते. अनेक संत आपल्या हयातीतच संत म्हणून मान्यता पावत असले तरी कोणत्याही संताचे संतपण काळाच्या कसोटीवर टिकून राहावे लागते. ईश्वर आणि मानव हयांच्यातील मध्यस्थ म्हणूनही संताकडे कधीकधी पाहिले जाते."08 संता संबधी हे अत्यंत मौलिक स्वरूपाचे चिंतन आहे. यातून संत संकल्पना यथार्थ रूपात स्पष्ट होते. धर्मातील सर्वोच्च मूल्याचे प्रात्यक्षिक संतांच्या कृतीतून होत असते. धर्माच्या तत्त्वज्ञानानुसार जगून समाजसमोर आदर्श प्रस्थापित करणारा सत्पुरुष म्हणून संताकडे पाहिले जाते. समाजविन्मुख होऊन वनात जाऊन तपश्चर्या करणारा तो संत नसून समाजात मिसळून आपल्या कृतीतून समाजमने संस्कारीत करतो. त्यालाच संत असे संबोधले आहे. चीनी विचारवंत कन्फयुशस सज्जनाची व्याख्या करताना म्हणतो "जो मानसावर प्रेम करतो, स्वतः बरोबरच इतरांचेही शील उन्नत करतो, तोच सज्जन होय."09ज्याची कीर्ती काळाच्या कसोटीवर टिकते तोच संत असा संताविषयीचा व्यापक दृष्टिकोन येथे मांडला आहे. हिंदू धर्मात संत ही पदवी कुठल्या पीठाकडून दिली जात नाही तर लोकच काही व्यक्तींना संत ही उपाधी देतात.

**संस्कृत साहित्यातील संत संकल्पनेचा मागोवा :-**

आज संत शब्दाबद्दल समाजमनात अनेक प्रकारच्या धारणा आहे. संत संकल्पनेद्दल फारसे एकमत आढळत नाही. काही लोक संताकडे श्रद्धेने पाहतात. तर काही लोक संताकडे संशयाने पाहतात. काही अभ्यासक संतांनी महाराष्ट्र संस्कृती घडवल्याचे तर काही अभ्यासक संतानी महाराष्ट्र बुडवला असल्याचे सांगतात. संत संकल्पनेबद्दल समाजात आज ज्या धारणा आहेत. त्याची मुळं आपले संस्कृत महाकाव्य आणि पुराणात सापडतात. त्या दृष्टीने महाकाव्यातील संत संकल्पनेचा मागोवा घेणे महत्त्वाचे ठरते.

संत हा शब्द घ्सत् ङ शब्दापासून उत्पन्न झाल्याचे सांगितले जाते. घ्सत्ङम्हणजे जें अस्तित्वात आहें ते या घ्संतङशब्दाला पुढे अनेक अर्थाचे वलय प्राप्त होऊन याचा अर्थविस्तार झाला. श्रीमदभगवद्गीतेच्या सतराव्या अध्यायात ओम तत्सतङ असे जे वर्णन आले त्यातून सत् शब्दाचा अर्थ सद्भाव, साधुभाव, प्रशस्त कर्म असा सूचित होतो.

च्यज्ञे तर्पास दाने च स्थितिः सदिति चोच्यते |
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते || छ10 27

या श्लोकातून यज्ञ, दान, तप करीत राहणे असा सत् शब्दाचा अर्थ सांगितला आहे. परमार्थ साधनेसाठी ज्या गोष्टी केल्या जातात त्याचा समावेश सत् संकल्पनेत केल्याचे येथे पहायला मिळते. या भागवतातील संत शब्दाचा उत्पत्तीच्या दृष्टीने आपला विचार स्पष्ट करतांना श्री. न.र. फाटक म्हणतात. च्सत् चा एक अर्थ चांगले, भले असा होत असतो. संत हे सत् चे अनेकवचनी रूप मराठींत थोर पुरुष या अर्थानें रूढ झालेले आहे. संस्कृत भाषेमध्ये प्रायः संत् चा अनेकवचनांतच प्रयोग केला गेला असल्यानें संत हा शब्द मराठीत आला. छ11 धर्म आणि नीतिच्या मार्गाने वाटचाल करणाऱ्या सदाचारी सत्पुरुषाला संत असे संबोधले आहे. याचा अर्थ संत होण्यासाठी घरादाराचा त्याग करून वनात जाऊन बसण्याची आवश्यकता नाही. संत संकल्पनेबद्दलच्या अज्ञानातून अलीकडे बायकमुलाचा त्याग करून परमेश्वरांच्या मागे लागलेल्या माणसाला संत संबोधले जाते. साधु संत, बैरागी, महंत हे शब्द चांगल्या गुणाचे वाचक आहेत. पण ज्याने या जगाकडे पाठ फिरवले तो साधू अशी मानसिकता रूढ झाली आहे. यामुळे साधू आणि संताकडे समाज नकारात्मक दृष्टीतूनच पाहत असल्याचे लक्षात येते. जो जगाच्या कल्याणासाठी काही तरी रचनात्मक काम करतो त्यालाच छांदोग्य उपनिषदांत साधू संबोधले आहे.

च्समस्तस्य खलु साम्न उपासनं साधु |
त्सामेत्याचक्षते | यदसाधु तदसामेंति || छ12

या मंत्रात दांडगाई आणि उद्धटपणाचा अभाव या अर्थाने साधू हा शब्द वापरला आहे. बृहदारण्य कोर्पानषदात घ्साधुकारी साधुर्भवतिङ या उक्तीतून सदाचारी व्यक्ती म्हणजे साधू अशी साधूची व्याख्या केली आहे. अनेक वेळा साधू आणि संत शब्द समानार्थानेच वापरलेली आहेत. भगवदगीतेत आदर्श या अर्थानेच साधू शब्द रूढ असल्याचे दिसते घ्परित्राणाय साधुनाङ या शब्दातून साधुच्या रक्षणासाठी देवाला आवतार घेण्याची वेळ येत असल्याचे सांगतात.

महाभारतामध्ये संत हा शब्द अनेक वेळा आला असून त्यातून संतांचे सद्गुणच प्रतिपादित झाले आहेत. वनपर्वात सत्यवानाचे जीव घेऊन यमाचा सावित्री पाटलाग करते. तेव्हा आपल्या मागे न येता तिला परत जायला यम सांगतो. तेव्हा नवऱ्याबरोबर जाण्यात धर्माचरण असल्याचे आपल्या श्रेष्ठ लोकांनी सांगितल्याचा दाखला ती यमाला देते. सावित्रींनी श्रेष्ठलोक हा शब्द संत या अर्थानेच वापरल्याचे सांगितले जाते.. घ्तस्मात्सन्तो धर्ममाहु : प्रधानम्ङअसे ती संताचे महात्म्य सांगते. यावर यमाने प्रसन्न होऊन तिला वर दिले तरी ती यमाची पिच्छा सोडीत नाही. यम पुन्हा पुन्हा परत जायला सांगतो पण ती जात नाही. निरर्थक अट्टाहास कशासाठी करतेस? असे यमाने विचारल्यानंतर ती सावित्री यमाला जे उत्तर देते त्यातून संत संतांची लक्षणेच प्रकटली आहेत. घ्संतस्त्वेवाप्यमित्रेषु दयां प्रातेषु कुर्वतेङ ( मनानें, वाचेनें व कर्मानें सत्पुरुष सर्वाबद्दल अद्रोहाची वृत्ति बाळगतात, ते सर्वावर अनुग्रह करतात, सर्वांना दाने देतात; संत हेच

असे असतात कीं, जे शत्रुवर देखील उपकार करतात ) माणसाला स्वत:चा जेवढा विश्वास वाटत नाही तेवढा संताबद्दल वाटतो; यामुळेच सर्वजन संतांच्या प्रेमाची अकांक्षा धरतात; संत कधी कुणाचा द्वेष करीत नाहीत. असा संतांचा महिमा सांगून यमाला प्रसन्न करून सवित्री आपल्या पतीचा जीव यमापासून परत आणते.

महाभारतात विविध संदर्भानुसार अनेक ठिकाणी संतांचा महिमा प्रकट झाला आहे. वणपर्वातील यक्षप्रश्न या प्रकरणात लोकांनी आपल्या हिताचा मार्ग कुणाकडे पाहून अनुसरावा हे विचारण्यासाठी यक्षाने धर्मराजाला उद्देशून घ्को दिकङ(दिशा शब्दाची व्याख्या काय?) असा प्रश्न विचारला. यक्षाच्या सांकेतिक प्रश्नाला धर्मराजांनी घ्संतो दिकङ(संत हेच दिशा होत) असे मार्मिक उत्तर दिले. यातून संत हेच लोकांचे मार्गदर्शक; संतांच्या वागणुकीची पद्धत हीच लोकहिताची दिशा असे धर्मराजाना सांगायचे होते. धर्मराजाच्या उत्तरातून लोकांच्या कल्याणाची जबाबदारी मनांत बाळगून कृतीशील राहणारे ते संत असा संत विषयक दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.

योगवासिष्ठांत जीवन्मुक्त, साधू, पंडित, शिष्ट, प्राज्ञ, वृद्ध अशा अनेक वेगवेगळया शब्दांनीं संताबद्दल वर्णन केलेले आहे. योगवासिष्ठाच्या निर्वाण प्रकरणाच्या उत्तरार्धातील एक पूर्ण अध्याय संत वर्णनासाठी वाहिलेला आहे. त्याचे वर्णन भाषांतरकार ग. वि. चिपळूनकरांनी पुढील प्रमाणे केला आहे. च जे विवेकी विरक्त असतात, त्यांचे लोभमोहादि शत्रू अल्पत्वास प्राप्त होतात. ते इष्ट प्राप्तीनें हृष्ट होत नाहीत; कोणीं अपकार केला तर रागावत नाहींत. विषय समूहांचा ते संग्रह करीत नाहींत. लोकांमुळें ते उद्विग्न होत नाहींत आणि स्वत: तें लोकांना उद्विग्न करीत नाहींत. ते कर्मठ नसतात. शास्त्रार्थांचें त्यांना मोठें प्रेम असतें. लोकांतील उच्च नीच भाव किंवा ग्राह्य-त्याज्य हें त्यांना बिनचुक समजते. ते अतिथींचा मन:पूर्वक सत्कार करतात. जनतेच्या पापाचा निरास करणारे ते जनतेला गुणांनीं वश करतात. राजांचा देशविघातक क्षोभ, दुष्काळ, परचक्र, जनक्षोभ इत्यादिकांचें ते पर्वताप्रमाणें निवरण करतात. विपत्तीत उत्साह देणारे व संपत्तीत सुख देणारे असे ते असतात.छ13 यातून संत लक्षणांचा अनेकार्थाने विचार केलेला आहे. संत म्हणजे लोकव्यवहारापासून लांब जाऊन अलौकिक सुखात रममान होणारा विरक्त अशी जी धारणा होती त्याला योगवसिष्टातून छेद मिळाला आहे. योगवसिष्ठातून संतांची भूमिका ही समाजाचा समुपदेशक समन्वयक, जागल्या, समाजिक कार्यकर्त्यासारखे असल्याचे लक्षात येते.

संस्कृत अमरकोशात सन् या शब्दाचे एकवीस भिन्नभिन्न पर्याय दिले आहेत. हेमचंद्र या कोशकारांनी सन् शब्दाचे चोवीस पर्याय सांगितले आहेत. अमर व हेमचंद्र या दोघामधील वैजयंता कोशात सन् बद्दल सुलभ विवेचन आले आहे. च सनङ सत्येऽभ्यर्हिते श्रेष्ठे साधीर्यास भवत्यपि छ14 अशा प्रकारे बुद्धि, विद्वत्ता, निपुणता, विवेचकता, प्रसिद्धि, दूरदर्शित्व, उद्योग, चातुर्य, असे किती तरी गुण सन्(संत) या शब्दाची पदवी मिळवणाऱ्याच्या अंगी आवश्यक असल्याचे या श्लोकातून सूचित होते. पण अमराने हा श्लोक ब्रह्म वर्गात ठेवल्याने तो केवळ ब्राह्मण जातीचा दर्शक असल्याची शक्यता व्यक्त केली जाते. संत शब्दाला दिलेल्या पर्यायावरून संतांच्या ठिकाणी कोणते गुण असणे आवश्यक आहे. हे अमर कोशातून लक्षात येते.

शंकराचार्यांच्या स्फुट प्रकरणात संता बद्दल वेळोवेळी जे वर्णन आलेले आहे. त्यातूनही संतांची लक्षणे स्पष्ट होतात. संत आणि महंत या दोन्ही शब्दांचा एकत्रित वापर शंकराचार्यांनी केला आहे.

च्शांन्ता महान्तो निवसन्ति सन्तो
वसन्तवल्लेकहितं चरन्त:|
तीर्णा: स्वयं भीमभवार्णवं जनान्
अहेतुनान्यानपि तारयन्त:|| छ15

वृत्तीने शांत आणि उदार अंतःकरणाचे संत हे वसंत ऋतुप्रमाणे सुखद असतात. ते सदैव लोकहितात मग्न असतात. या संसाररूपी सागरात स्वतः जसे तरून जातात, तसेच ते निरपेक्षभावाने इतरांनाही तारतात. कोणतीही अपेक्षा न ठेवता जो जगाच्या कल्याणार्थ झटतो. तो माणूस म्हणजे संत अशी शंकराचार्यांची भूमिका असल्याचे दिसते.

भर्तुहरीच्या नीतिशतकात संत, साधू, महंत, महात्मा यांच्याबद्दल जे वर्णन आलेले आहे. ते पूर्वपरंपरेला अनुसरूनच आहे. घ्संतः स्वयं परहिते विहिताभियोगाःङ आणि घ्सन्मित्रलक्षणमिदं प्रवदान्ति संतङ अशा सुभाषितातून विद्येचे व्यसन, लोकापवादाचे भय, सज्जनसंगतीची आस्था, दुसऱ्याचे सदगुण घेण्याची वृत्ती, परोपकाराची आवड अशी संताची लक्षणे सांगितली आहेत. एकंदर संस्कृत महाकाव्य आणि पुराणातून पदोपदी संताबद्दलचे जे वर्णन आले. त्याची परिशीलन केल्यानंतर डॉ.न.र.फाटक संताची व्याख्या करतांना म्हणतात. च्स्वतः कमावलेल्या उत्कृष्ट गुणांच्या सामर्थ्यानें लोकोद्धारांत आयुष्य वेचणाऱ्या पुरुषाला संत म्हणावे. छ16 अत्यंत समर्पक अशी व्याख्या करून लोकांच्या उद्धारार्थ तळमळणाऱ्या व्यक्तींना संत म्हणावे येथे सांगितले आहे. संत महंत ही पदवी कोणत्या पीठाकडून मिळत नसून माणसाच्या सत्कृतीतून समाजाकडूनच उत्सफुर्तपणे ही पदवी दिली जाते. भक्तासाठीही संत हा शब्द वापरला जातो. केवळ स्वतःच्या कल्याणासाठी देवाची भक्ती करणारा संत होत नसून आत्मकल्याणा बरोबरच जगाच्या कल्याणसाठी झटणारा माणूसच खऱ्या अर्थाने संत ठरतो. धर्माचे तत्त्वज्ञान आपल्या कृतीतून सिद्ध करून लोकासमोर आदर्श प्रस्थापित करणारा सत्पुरुष म्हणजे संत होय.

संदर्भ ग्रंथ :-

1. कुलकर्णी कृ.पा., मराठी व्युत्पत्ति कोश, शुभंदा प्रकाशन, पुणे पृ753.
2. तत्रैव - पृ.778.
3. भाटवडेकर मो. वि. , राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश, राजहंस प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2007. पृ.700.
4. अग्निहोत्री द. ह., अभिनव मराठी-मराठी शब्दकोश, व्हीनस प्रकाशन, पुणे.पृ. 751
5. तत्रैव - पृ.77
6. जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण- 2010.पृ. 733.
7. कुलकर्णी अ.र., मराठी विश्वकोश, खंड आठरा, सूची- 60.
8. तत्रैव - सूची 60.
9. तत्रैव - सूची 60.
10. फाटक न. र., ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती 2011
11. तत्रैव - पृ.
12. तत्रैव - पृ.
13. तत्रैव - पृ.
14. तत्रैव - पृ
15. तत्रैव - पृ
16. तत्रैव - पृ09